# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/06/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### पोस्टे खापा हद्दीत गांजा विक्री करणाऱ्या इसमास जेरबंद
### 65,680/– रू च्या मुद्देमाल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या ताब्यात

दिनांक 21/06/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार हे आपले पथकासह सावनेर उपविभगात पो.स्टे. खापा अंतर्गत पेट्रोलींग करीत असता विश्वसनिय खात्रीशिर पोलीस मित्राद्वारे माहितीा मिळाली कि, खापा वार्ड क्र.1 हनुमान घाट येथे राहणारा इसम इश्वर गणपती पराते हा आपले राहते घरी अमली पदार्थ गांजा जवळ बाळगुन विक्री करीता ठेवला आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांनी तात्काळ स्वत: उपस्थित राहुन सोबत असलेल्या स्टाफसह सापळा रचुन खापा वार्ड क्र. 1 हनुमान घाट येथे आरोपी नामे ईश्वर गणपती पराते याचे राहते घराची घर झडती घेतली असता सदर इसमाचे घराच्या बैठक खोलीत टिव्ही ठेवलेल्या टेबलाच्या खाली प्लास्टीक चुमडीने छाकुन असलेल्या पांढऱ्या रंगाच्या पॉलीथीन पिशवी मध्ये खाकी रंगाचे बंडल दिसुन आले. सदर बंडल उघडुन पाहिले असता अमली पदार्थ गांजा असल्याचे खात्री झाल्याने पंचनाम्यातील नमुद पंचासमक्ष वजन काटयाने मोजमाप करून 06 किलो 614 ग्रॅम अमली पदार्थ गांजा कि. 65,680/– रू. चा माल मोक्यावर आरोपी ईश्वर गणपती पराते वय 40 वर्षे, खापा वार्ड क्र.1 हनुमान घाट यांचे ताब्यातुन जप्त करण्यात आला.

आरोपींचे सदरचे कृत्य हे एनडीपीएस ॲक्ट कलम 20,22 अन्वये गुन्हा होत असल्याने आरोपीतांविरूध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाही कामी पोस्टे खापा नागपूर ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर गडेकर, निलेश बर्वे, पोना सत्यशिल कोठारे, मपोना नम्रता बघेल, चापोना अमोल कुथे, चापोशि आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर